# भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा आर्थिक परिप्रेक्ष्यातून अभ्यास

## (१७५७-१९४७)

संपादन

**डॉ. उत्तम पठारे । डॉ. लहू गायकवाड**
ग्रामोन्नती मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे, ४१० ५०४.
(पदव्युत्तर इतिहास संशोधन केंद्र)

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा आर्थिक परिप्रेक्ष्यातून अभ्यास

(१७५७-१९४७)

डॉ. उत्तम पठारे । डॉ. लहू गायकवाड

© ग्रामोन्नती मंडळाचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१० ५०४
(पदव्युत्तर इतिहास संशोधन केंद्र )

**प्रकाशक व मुद्रक** । सनय प्रकाशन
शुभम विश्व, मोगरा बी.१४, आनंदवाडी,
नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०४.
मो. ९८६०४२९१३४, ९९६०६१७३०६
Email : sanayprakashan@gmail.com

**मुखपृष्ठ मांडणी** । रुतेश पवार
**अक्षरजुळणी** । सनय संगणक विभाग
**मुद्रणस्थळ** । ए. आर. प्रिंटर्स, पुणे

**प्रथमावृत्ती** । १९ फेब्रुवारी २०२०
**पृष्ठसंख्या** । ३४४
**ISBN : 978-93-84600-38-9 (HB)**

**स्वागतमूल्य** । ३५० ₹ (तीनशे पन्नास रूपये फक्त)

---

*(The Editor Acknowledge His Indebtedness to the Indian Council of Historical Research for the Grant-In-Aid Received by him for National Seminar on Topic a **'Study of Indian Freedom Movement through Economic Prospective'**. Some Selective research Papers are included in this book.)*

*(सदर पुस्तकातील घटना, वर्णने, मते ही लेखकाची स्वतःची असून या घटनांशी, वर्णनांशी अथवा मतांशी संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.)*

ऋषितुल्य गुरुवर्य राजाराम परशुराम
तथा
रा. प. सबनीस यांच्या पवित्र स्मृतीस
सविनय सादर...

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

अनुक्रमणिका


०९ । लोकहितवादींचे आर्थिक विचार : एक अभ्यास
डॉ. शामराव घाडगे । ७७

१० । १८५७ च्या उठावाचे भारतीय अर्थव्यस्थेवरील परिणाम
डॉ. उत्तम पठारे । ८३

११ । महात्मा जोतिराव फुले यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास व भारतीय स्वातंत्र्य चळवळीवरील प्रभावक्षेत्रे
डॉ. पद्‌माकर गोरे । ९६

१२ । कृष्णराव भालेकरांचे अर्थचिंतन
डॉ. किसन अंबाडे । १०३

१३ । न्या. महादेव गोविंद रानडे यांचे आर्थिक विचार
डॉ. शिल्पा शेटे । १०७

१४ । न्यायसिंधु नियतकालिकामध्ये आर्थिक परिप्रेक्ष्यातून मांडले गेलेले विचार एक ऐतिहासिक अभ्यास (१८८५-१८९३)
प्रा. स्वाती शिंदे । ११५

१५ । आर्थिक राष्ट्रवाद आणि वृत्तपत्रे
डॉ. भारती नवथर । १३२

१६ । बडोदा संस्थानातील तिसरे सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या आर्थिक सुधारणा
डॉ. विलास गोर्डे । १४०

१७ । श्रीमंत मुधोजी महाराज यांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी केलेले कार्य
प्रा. संतोष कदम । १४७

१८ । आधुनिक उद्योगधंद्याचा उदय व विकास
डॉ. भूषण फडतरे । १५५

१९ । मुंबईतील शोषित गिरणी कामगार : एक अभ्यास
डॉ. मीना साळे । १६४

२० । अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळींचा आर्थिक संदर्भ (इ. स. १८१८-१९४७)
प्रा. नवनाथ वाजगे । १६९

२१ । वसाहतवादी धोरणविरुद्ध रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची धारावाढ निवारण चळवळ
डॉ. बबन जाधव । १८०

२२ । चित्रमय जगत मासिक : आर्थिक राष्ट्रवादी लेखन (१९१०-१९४७)
डॉ. श्वेता सावले । १९१

२३ । अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया
डॉ. नंदकुमार जाधव । १९६

२४ । राष्ट्रवीर साप्ताहिकातून व्यक्त झालेले आर्थिक विचार
प्रा. विशाल रोकडे । २०१

२५ । 'प्रगति' मधून व्यक्त झालेला अर्थविचार
डॉ. गणेश राऊत । २०५

२६ । 'ज्ञानप्रकाश' वृत्तपत्राचे आर्थिक राष्ट्रवाद निर्मितीतील योगदान (इ. स. १९३१-१९५०)
डॉ चंद्रभान मेंगाने । २२९

२७ । महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार
मन्सुर सुतार । २३९

२८ । डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक तत्वज्ञान आणि राज्य समाजवाद
प्रा. अशोक डिंबर । २४४



Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College o
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda.

रघू भिकाजी या जागृत कामगारांनी शोषणाविषयीची माहिती फॅक्टरी कमिशनला दिली. कामाच्या नियमासंबंधीचे पत्रक काही गिरण्यांनी मराठी, गुजराती, इंग्रजी भाषेत छापून लावलेले होते. गैरवर्तन आणि त्यासाठी आकारला जाणारा दंड याविषयी मात्र कोणत्याही गिरणीने उघडपणे पत्रक लावल्याचे दिसत नाही. दंड म्हणून पगार कपातीचे प्रमाण एकूण मासिक पगाराच्या २ ते ५ % एवढे मर्यादित केले होते. कामगार ग्रामीण गरिबींच्या वातावरणातून आले होते. गिरण्यांतील शिस्तदंडाच्या नियमांनी बांधलेले होत यामुळे त्यांच्या हाती अपूरे वेतन पडत नग पद्धतीवर काम केल्यामुळे अनेकदा नुकसान होत.

अधिक उत्पादन काढण्याच्या स्पर्धेत मिल एजंटाची संख्या वाढली. केवळ दोन दशकात मुंबईचा कापड उद्योग भरभराटीला आला. त्याची मँचेस्टरच्या कापड उद्योगाशी स्पर्धा सुरु झाली. पण मुंबईच्या कामगारांची दैन्यावस्था झाली. ही दैन्यावस्था दूर करण्यासाठी कामगार संघटनेची निर्मिती होणे आवश्यक होते. प्रारंभीच्या काळात अनेक विचारवंत, पत्रकार, समाजसेवक यांनी गिरणी कामगारांच्या त्रासाविषयी वेळोवेळी अर्ज विनंत्या केल्या, पण कामगारांचे शोषण चालूच होते. या शोषणाला पायबंद बसण्याची सुरुवात झाली ती प्रत्यक्ष गिरणी कामगार संघटीत झाल्यावरच.

### संदर्भ आणि टिपा


०१. आर. डी. गाडगीळ, *इंडस्ट्रिअल इव्होल्यूशन ऑफ इंडिया इन रिसेंट टाईम्स*, मुंबई, १९२४, पृ. १५.

०२. अ. का. प्रियोळकर डॉ. भाऊदाजी लाड, *काल आणि कर्तुत्व*, मुंबई, १९७१, पृ. ३०९.

०३. ख्रिस्तिन डॉबिन, अर्बन लीडरशिप इन वेस्टर्न इंडिया, १९७२, पृ. १९.

०४. य. दि. फडके, *विसाव्या शतकातील महाराष्ट्र*, खंड १, मुंबई, १९८१, पृ. १६-१७.

०५. राम कांडगे, *'महात्मा जोतीराव फुले व्यक्ती व कार्य'*, चाकण, २०००.

०६. मनोहर कदम *'भारतीय कामगार चळवळीचे जनक : नारायण मेघाजी लोखंडे'*, मुंबई, १९६२, पृ. ६३.






## अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळींचा आर्थिक संदर्भ (इ. स. १८१८-१९४७)


- प्रा. नवनाथ वाजगे


अहमदनगर जिल्ह्याचे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अतिशय महत्त्वाचे योगदान आहे. इ. स. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी अहमदनगरवर आपले वर्चस्व निर्माण केले. सुरुवातीच्या काळात 'जमीन महसूल' हा ब्रिटिशांच्या उत्पन्नाचा मोठा आधार होता. ब्रिटिशांनी त्यासाठी अहमदनगरमध्ये जमीन महसूल व्यवस्था राबवली. ब्रिटिशांच्या विविध आर्थिक धोरणांमुळे बाधित झालेल्या आदिवासी व शेतकरी वर्गाने ब्रिटिशांना विरोध करण्यास सुरुवात केली. अहमदनगर जिल्ह्यातील सह्याद्रीच्या डोंगररांगांमधील भिल्ल, कोळी व रामोशी यांच्या बंडाच्या स्वरुपात हा असंतोष सर्वप्रथम प्रकट झाला. इ. स. १८२२ (रामजी भांगरे), १८३० (रामा किरवा), [illegible] भांगरे), १८५५ (भागोजी नाईक), १८५९ (भागोजी व हरजी नाईक), [illegible], १८७३ (होन्या बापू केंगले) या भिल्ल, कोळी व रामोशी जमातींच्या नेत्यांनी ब्रिटिशांच्याविरुद्ध सशस्त्र बंडाचे हत्यार उगारले. अर्थातच ब्रिटिशांनी आपल्या बळकट सैन्य व प्रशासनाच्या जोरावर ही बंडे मोडून काढली. इ. स. १८७५ मध्ये अहमदनगरमधील शेतकऱ्यांनी विशेषतः शांत समजल्या जाणाऱ्या कुणबी समाजाने सावकरकरांच्या विरोधात बंड केले. अहमदनगर, पुणे, सोलापूर इत्यादी ठिकाणी झालेले हे दंगे भारताच्या इतिहासात 'दख्खनचे दंगे' म्हणून प्रसिद्ध आहेत.

इ. स. १८६९ मध्ये ब्रिटिशांनी अहमदनगर जिल्ह्याची पुनर्रचना केली. आज नकाशात दिसत असलेला अहमदनगर जिल्हा इ. स. १८६९ मध्ये अस्तित्त्वात आला. इ. स. १८५८ मध्ये ब्रिटिशांच्या भारतातील वित्तीय साम्राज्यवादी अर्थव्यवस्थेच्या तिसऱ्या टप्प्याला (१८५८-१९४७) सुरुवात झाली. ब्रिटिशांच्या जागतिक पातळीवरील आर्थिक धोरणांचा परिणाम तसा भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला तसाच तो अहमदनगर जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेवर व आर्थिक जीवनावर देखील घडून आला. ब्रिटिशांनी भारतात


Savitribai College of Arts ★ Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

जशा दळणवळणाच्या व जलसिंचनाच्या सुविधा निर्माण केल्या तशाच त्या अहमदनगरमध्ये देखील केल्या. अर्थव्यवस्थेतील या विविध बदलांमुळे येथील शेतकरी, व्यापारी, कारागीर आणि आदिवासी देखील जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडला गेला. याकाळात हा वर्ग प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडे हळूहळू आकृष्ट होत गेला. अर्थात् इ. स. १८८५ ते १९२० या काळात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने प्रामुख्याने अभिजन वर्गाची धोरणे राबवित असल्याने सहभागाचे हे प्रमाण कमी होते. इ. स. १९२० मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षांवर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव वाढून जनचळवळीच्या दिशेने वाटचाल सुरु झाली. त्यामुळे असहकार चळवळ (१९२०-२२), सविनय कायदेभंग चळवळ (१९३० व १९३२), चलेजाव चळवळ (१९४२) या जनवादी चळवळींमध्ये अहमदनगर जिल्ह्यातील जनतेचा सहभाग वाढत गेला. सविनय कायदेभंग चळवळीच्या कालखंडात अहमदनगर जिल्ह्यातील अकोला व संगमनेर या तालुक्यांतील जंगल सत्याग्रह संपूर्ण देशभरात गाजले. एवढेच नव्हे तर संपूर्ण देशातील जंगल सत्याग्रहाची सूत्रे संगमनेर येथील कार्यालयातून हलवली जात होती. पुढे इ. स. १९४२ च्या चलेजाव चळवळीत अहमदनगरमधील बॉंबस्फोटांची प्रकरणे विशेष गाजली. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांचा परिपाक म्हणून अहमदनगरमधील सर्वच समाज गटांतील लोक स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. महात्मा गांधीच्या 'वर्गमेळाची' संकल्पना अहमदनगरमध्ये खऱ्या अर्थाने राबविली गेली असे म्हणता येते.

**पारिभाषिक शब्द**

असहकार, सविनय कायदेभंग, प्रतिसरकार, जनयुग, वर्गमेळ, जंगल सत्याग्रह इत्यादी.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी इंग्रजी भाषेतील 1. Source Material for a History of Freedom Movement: Civil Disobedience Movement, 2. Calendar of 'Quit India' Movements In The Bombay Presidency, 3. Maharashtra State Gazetteers, Ahmednagar District (1976) ही महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटियर विभागाद्वारा प्रकाशित केलेली प्राथमिक साधने तसेच मराठी भाषेतील य. दि. फडके लिखित *'विसाव्या शतकातील महाराष्ट्र'* खंड ३, ४ व ५ तसेच *'कथा स्वातंत्र्याची'* (कुमार केतकर), *'महाराष्ट्रातील स्वातंत्र्यलढे'* (वि. गो. खोबरेकर), *'महाराष्ट्रातील काँग्रेसचा स्वातंत्र्यलढा'* (सुमन वैद्य व शांता को[illegible]) या दुय्यम संदर्भग्रंथांचा उपयोग केला आहे.



**प्रस्तावना**

ब्रिटिशांच्या भारतातील राजवटीचा मुख्य हेतू भारताचे 'आर्थिक शोषण' हाच होता. हे शोषण ब्रिटिशांनी विविध मार्गांनी केले. जमीन महसूल, कर, व्यापार, उद्योग, वेतन अशा विविध मार्गांनी भारताचे आर्थिक शोषण केले. सुरुवातीच्या काळात अस्थिर राजकीय परिस्थितीला कंटाळलेल्या भारतातील काही लोकांना ब्रिटिशांचे आगमन ही 'ईष्टापत्ती' देखील वाटली. परंतु ब्रिटिशांचे खरे स्वरुप जेव्हा भारतीयांच्या लक्षात येऊ लागले. तेव्हा ब्रिटिशांना भारतीयांकडून विरोध सुरु झाला. हा विरोध इतिहासलेखन, साहित्य निर्मिती, वृत्तपत्रे व नियतकालिके, राजकीय आंदोलने या स्वरुपात जसा प्रकट झाला, तसा तो ब्रिटिश साम्राज्याची भारतीयांनी जी 'आर्थिक मीमांसा' केली त्यातून देखील प्रकटला. ब्रिटिशांच्या भारतातील राजवटीला स्वदेशी व बहिष्कार या अस्त्रांनी चोख उत्तर द्यायला सुरुवात झाली. हा विरोध कधी असंघटित स्वरुपाचा तर कधी संघटित स्वरुपाचा होता. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर अखिल भारतीय पातळीवर ब्रिटिशांना विरोध सुरु झाला. मवाळ कालखंड, जहाल कालखंड व गांधीयुग या टप्प्यांमधून हा विरोध वाढत गेला. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांचा परिणाम म्हणून इ. स. १८१८ ते १९४७ याकाळात अहमदनगर जिल्ह्यात ह्या राष्ट्रीय चळवळीचा जन आधार कसा वाढत गेला. ब्रिटिशांची आर्थिक धोरणे व अहमदनगरमधील भारतीय स्वातंत्र्याची चळवळ यांचा आर्थिक संदर्भातून सहसंबंध शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून केला आहे.

**अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा आर्थिक संदर्भ**

इंग्रजांचा अहमदनगर जिल्ह्याशी प्रथम संपर्क इ. स. १८०३ मध्ये आला. यावेळी अहमदनगरचा किल्ला शिंदे घराण्याच्या ताब्यात होता. इ. स. १८०३ मध्ये लॉर्ड वेलस्लीने हा किल्ला जिंकून आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे पेशव्यांचा येथील अंमल नष्ट झाला. पुढे इ. स. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी पेशव्यांच्या ताब्यातील अहमदनगरवर आपले वर्चस्व निर्माण केले. पेशवाईच्या अस्तानंतर इ. स. १८२२ मध्ये अहमदनगर जिल्ह्याची निर्मिती झाली. [illegible] अहमदनगर जिल्ह्याची सरहद्द आताच्या नाशिक जिल्ह्यातील वणी तर दुसऱ्या टोकास सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथपर्यंत होती.[1] ब्रिटिशांनी

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa. Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

अहमदनगरवर वर्चस्व मिळवल्यानंतर कायदा व प्रशासन राबवण्याचा प्रयत्न केला. मराठा काळातील अस्थिर राजकीय परिस्थितीला कंटाळलेल्या जनतेला त्यामुळे शांती मिळाली. परंतु ब्रिटिशांच्या धोरणांमुळे अहमदनगरमधील कोळी व भिल्ल समाजाच्या लोकांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध बंड पुकारले. यावेळी दख्खनचा कमिशनर एल्फिन्स्टन याने हेन्री पॉटिंजर यांची अहमदनगरच्या कलेक्टर म्हणून नियुक्ती केली.

इ. स. १८१८ मध्ये हेडक्वार्टरला दिलेल्या अहवालात पॉटिंजर कळवतो की, मराठा काळात सततच्या युद्धाला कंटाळलेले लोक आता शांत झाले आहेत. एल्फिन्स्टनने पॉटिंजरला अहमदनगर जिल्ह्याची विभागणी ५०००० रुपये ते १,००,००० रुपये महसूली उत्पन्न देणाऱ्या तालुक्यांमध्ये करण्यास सांगितले.[२] त्यानुसार पॉटिंजरने महसूल गोळा करण्यासाठी व्यवस्था राबविली. परंतु भिल्ल आणि रामोशी जमातींच्या प्रदेशात तो ही व्यवस्था राबविण्यात असमर्थ ठरला. त्यामुळे अहमदनगरमधील सह्याद्रीच्या डोंगररांगांमधील कोळी व भिल्ल जमातीच्या लोकांनी बंडांचे हत्यार उपसले. इ. स. १८२२ मध्ये सर्वप्रथम रामजी भांगरे व गोविंदराव खारी यांचे बंड झाले. हे बंड मोडून काढण्यासाठी कॅप्टन मॅकिंटाश याने अथक प्रयत्न केले. इ. स. १८३० मध्ये रामा किरवा याने भिल्लांच्या सहाय्याने बंड केले. हे बंड मोडण्यासाठी कॅप्टन ल्युकिन आणि लेफ्टनंट फोर्बस् यांनी प्रयत्न केले. इ. स. १८४५ ते १८४७ या दरम्यान राघोजी भांगरे याने नाशिक व अहमदनगर येथे कोळी समाजाच्या सहाय्याने बंड केले. यात जुलमी मारवाड्यांचे (सावकार) नाक कापण्याचे प्रकारदेखील झाले, कॅप्टन गेलने राघोजी भांगरेला पकडून फाशी दिले.[३] इ. स. १८५५ मध्ये भागोजी नाईक याने भिल्लांना संघटित करून बंड केले. तसेच पाथर्जी नाईक, जावजी नाईक बोमला यांनी देखील उठाव केला. इ. स. १८५७ च्या उठावावेळी अहमदनगर जिल्ह्यातील ७००० भिल्ल्यांनी दक्षिण नाशिक व अहमदनगरमध्ये उठाव केला. इ. स. १८५९ मध्ये पुन्हा भागोजी व हरजी नाईक यांनी भिल्लांच्या सहाय्याने अहमदनगरमध्ये उठाव केला. इ. स. १८७३ मध्ये होन्या बापू कॅंगले याने पुणे, अहमदनगर व नाशिकच्या पश्चिम पट्ट्यात बंड केले. अशाप्रकारे ब्रिटिशांच्या धोरणांमुळे प्रभावित झालेल्या अहमदनगरच्या पश्चिम पट्ट्यात ब्रिटिशांना भिल्ल, कोळी व रामोशी समाजाच्या बंडांना समोरे जावे लागले. अर्थातच् हा सर्व प्रतिकार असंघटित असल्यामुळे



ब्रिटिशांनी ही सर्व बंडे मोडून काढली.[४] इ. स. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी जरी अहमदनगर जिल्ह्याची निर्मिती केली असली तरी इ. स. १८६९ मध्ये खऱ्या अर्थाने आजच्या अहमदनगर जिल्ह्याची निर्मिती झाली. याचवेळी नाशिक व सोलापूर जिल्ह्यांची निर्मिती झाली. त्यामुळे वणी व करमाळा भाग अहमदनगर जिल्ह्यातून वगळण्यात आला. इ. स. १८६९ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात ११ तालुके होते. सध्या अहमदनगरमध्ये १४ तालुके आहेत.

इ. स. १८७५ च्या जूनमध्ये पुणे, नगर व सोलापूर या जिल्ह्यांत दरोड्यांची व जाळपोळीची साथ उद्‌भवली. सावकार व कुळे यांच्यात बेबनाव निर्माण होऊन त्यांचे पर्यवसान दंग्यांत झाले. हे दंगे 'दख्खनचे दंगे' (Deccan Riots) म्हणून प्रसिद्ध आहेत. पुणे जिल्ह्यातील सुपे या गावात दंग्यांना प्रथम सुरुवात झाली. त्यानंतर पुणे, अहमदनगर, नाशिक, सोलापूर व खानदेश या जिल्ह्यांत देखील दंग्यांचे लोण पोहोचले. दख्खनचे हे दंगे म्हणजे ब्रिटिशांच्या विविध धोरणांमुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांचा तो आक्रोश होता. ऋणमुक्त होण्याच्या उद्देशाने शेतकऱ्यांनी सावकारांजवळील कर्जरोखे, गहाणखते हिसकावून घेतली व जाळून टाकली. ज्या सावकारांनी कागदपत्रे देण्यास दिरंगाई केली त्यांचा समाचार घेण्यात आला. त्यांचे दस्तऐवज नष्ट करण्यात आले. काही सावकारांचे नाक व कान कापण्यात आले. त्यांना लुटले गेले. अहमदनगर जिल्ह्यातील शांतताप्रिय समजल्या जाणाऱ्या कुणबी समाजाने या दंग्यात मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला.[५] दख्खनच्या या दंग्यांचे कारण म्हणजे त्यावेळेपर्यंत शेतकऱ्यांचे दुःख निवारण करणारा कायदा अस्तित्वात नव्हता. शेतकरी वर्ग कर्जबाजारी झाला होता व सावकार त्यांना हवे तसे लुबाडत होते. शेतकरी कर्जबाजारी होण्यास वास्तविक पाहता ब्रिटिश सरकारची कृषीविषयक, महसूलविषयक धोरणे कारणीभूत होती. सरकारने जमिनीचा सारा वाढविला, व तो पूर्वीप्रमाणे वस्तूंच्या स्वरूपात देण्याची सवलत न ठेवता पैशाच्या रूपाने वसूल करायला सुरुवात केली. परिणामी हे दंगे घडून आले. अर्थातच ब्रिटिश सरकारने दंग्यांचे खापर सावकारांवरच फोडले.[६]

इ. स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. अखिल भार... संघटना स्थापना झाल्यामुळे भारतीयांना आपल्या वि...ची अभिव्यक्ती करण्यास व्यासपीठ मिळाले. भारतीय राष्ट्रीय कॉंगेसचे ... खंड (इ. स. १८८५-१९०५) ...

Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

कालखंड (इ. स. १९०५-१९२०), व गांधीयुग (इ. स. १९२०-१९४७) अशा तीन टप्प्यांत विभाजन करता येते. सुरुवातीच्या काळातील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हा अभिजनांचे प्रतिनिधीत्व करताना दिसतो. परंतु लोकमान्य टिळकांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्रात राष्ट्रीय काँग्रेस पक्षांची वाटचाल अभिजन वर्गाकडून जनयुगांकडं होऊ लागली. लो. टिळकांनी १९१८ मध्ये अहमदनगरमधील जनतेला संबोधित केले तेव्हा त्यांना सर्व समाजगटांतून चांगला प्रतिसाद मिळाला. राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्त्वाने देखील आपला सहभाग नोंदवायला सुरुवात केली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दाजीसाहेब कुकडे यांनी नगरच्या जनमानसात आपल्या कामाचा ठसा उमटवला. इ. स. १८६६ मध्ये *'न्यायसिंधू'* नावाचे वृत्तपत्र त्यांनी सुरु केले. त्याचबरोबर ज्ञानोदय (१८४२), *वृत्तवैभव* (१८६१) *नगर समाचार*, *सुदर्शन*, *जगदादर्श* यांसारख्या वृत्तपत्रांनी देखील सामाजिक व राजकीय क्षेत्रात जागृती घडवून आणली.[७] पुणे व सातारा भागात जसा मवाळ व जहाल यांच्यात भेद दिसतो तसा ठळक भेद अहमदनगरमध्ये मात्र दिसत नाही. अहमदनगरमधील दादासाहेब ज्ञानेश्वर, रावबहादूर जी. के चितळे हे दोघे मवाळ असूनही बाळासाहेब देशपांडे, भाऊसाहेब चौकर, नानासाहेब सप्तर्षी या राष्ट्रीय विचारांच्या नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध होते. जानकीबाई आपटे यांनी अहमदनगरमध्ये मुलींसाठी आश्रम उभा केला. इ. स. १८८५ ते १९२० याकाळातील नेतृत्त्व हे प्रामुख्याने अभिजनवादी होते असे म्हणता येते.

इ. स. १९२० मध्ये महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण देशभरात असहकार चळवळ सुरु झाली. असहकार चळवळीतील सहभागाबाबत महाराष्ट्रातील नेत्यांची प्रतिक्रिया संमिश्र होती. मुंबईकडील बहुमत गांधीजींच्या बाजूने होते. तर पुण्याकडील टिळक समर्थकांचा गट असहकार कार्यक्रमाला सुरुवातीला अनुकूल नव्हता. नागपूर व वऱ्हाडकडील भागात असहकारला मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. मुंबईच्या भागात टिळकांच्या विचारसरणीचा प्रभाव ओसरून गांधीजींचा प्रभाव वाढू लागला. काँगेसच्या कामकाजात काँग्रेसच्या स्थापनेपासून नीतिनिर्धारणत आघाडीला असलेला महाराष्ट्र इ. स. १९२० पासून मागे पडू लागला. गांधीप्रणीत असहकाराच्या कार्यक्रमातील कौन्सिल बहिष्काराचा मुद्दा महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्षाला मान्य नसला तरी त्यांनी काँग्रेसचे ऐक्य व प्रतिष्ठा टिकविण्यासाठी असहकार चळवळीला पाठिंबा



दिला. त्याला अनुसरून रत्नागिरी, ठाणे, सोलापूर, बेळगाव, कुलाबा, नाशिक, जळगाव, मलकापूर, वर्धा याप्रमाणेच अहमदनगर शहरातील सदस्यांनी देखील आपली उमेदवारी सोडून दिली.[८] ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांमुळे काही चांगले तसेच काही वाईट परिणामही घडून आले ब्रिटिशांनी केलेल्या जलसिंचनविषयक सुधारणांमुळे कृषी क्षेत्रात बदल घडून आले. उदा. प्रवरा नदीवरील भंडारदरा या धरणांमुळे अकोला, श्रीरामपूर, राहूरी तसेच संगमनेर या उत्तर अहमदनगरमधील कृषी क्षेत्राचा कायापालट झाला. इ. स. १९२२-२३ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात सरकारी कॅनल्सची संख्या १३ खाजगी कॅनल्सची संख्या १३६, खाजगी विहिरींची संख्या ४६,५८९ तर तलावांची किंवा धरणांची संख्या ४ इतकी होती.[९] त्यामुळे या परिसरात कापूस व साखरेचे उत्पादन वाढले. इ. स. १८७८ मध्ये सुरु झालेल्या दौंड मनमाड रेल्वेमुळे अहमदनगरच्या अर्थव्यवस्थेत बदल घडून आला. हा रेल्वेमार्ग अहमदनगर, जिल्ह्यातील सहा तालुक्यांमधून जात असल्याने, तसेच तो उत्तर व दक्षिण भारताला जोडला गेल्यामुळे अहमदनगरच्या व्यापारात वाढ घडून आली. विशेषतः कापसाचे उत्पादन व व्यापार या बाबत वाढ घडून आली. इ. स. १९२१ ते १९२५ या पाच वर्षांत मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड या दोन्ही प्रांतात कापसाच्या लागवडीखाली दरवर्षी वापरल्या जाणाऱ्या जमिनीचे एकरी प्रमाण वाढत होते. खानदेशातल्या कापूस पिकणाऱ्या शेतकऱ्यांप्रमाणेच मुंबई प्रांतातल्या कृष्णा खोऱ्यातील ऊस पिकवणारा शेतकरी व पुणे अहमदनगर जिल्ह्यातील कालवे असलेल्या भागातील शेतकरी सुखवस्तू व सधन होता. हा सुखवस्तू शेतकरी काँग्रेस पक्षाकडे आकृष्ट झाला.[१०]

इ. स. १९३० मध्ये महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशभरात सविनय कायदेभंग आंदोलन सुरु करण्यात आले. महात्मा गांधींनी दांडी याठिकाणी मूठभर मीठ उचलून सविनयरित्या कायद्याचा भंग केला व चळवळ सुरु झाली. पुढे या चळवळीची व्याप्ती वाढत गेली. मीठाच्या सत्याग्रहाबरोबरीने 'जंगल सत्याग्रह' प्रथमतः सुरु झाले. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांचा फटका जंगलात राहणाऱ्या आदिवासींना देखील बसला. ब्रिटिश राजवटीत १८६६ नंतर जंगलांबाबत कायदे [illegible] निर्बंध घालण्यात आले. मुख्य जंगले व गौण छोटी जंगले असे विभाजन केले गेले. आरक्षित जंगलात गुरं चारण्यास गवत कापण्यास विरोध झाले [illegible] निर्बंध घालण्यात आले.

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 56/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmedna...

आदिवासींना लाकूड, फळे औषधी वनस्पती वनसंरक्षकांची नजर चुकवून गोळा कराव्या लागत. आदिवासींच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे जंगलसंबंधीच्या कायद्यातील जाचक तरतुदींबद्दलचा असंतोष लक्षात घेऊन मीठाच्या कायदयाप्रमाणेच जंगलासंबंधीचे कायदे मोडून सत्याग्रह मोहिमेची व्याप्ती जुलै १९३० पासून वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले व संगमनेर हे तालुके ही चळवळ करण्यास अनुकुल क्षेत्र ठरतील असे जंगल सत्याग्रह समितीला वाटले. त्यामुळे मुख्य कार्यालय संगमनेर याठिकाणी उघडण्यात आले. रामकृष्णदास, लालजी पेंडसे आणि श्रीपाद शंकर नवरे हे तिघे या सत्याग्रहाचे सूत्रधार होते. २२ जुलै १९३० रोजी संगमनेर आणि अकोला तालुक्यात आषाढी एकादशीच्या निमित्ताने एकाच वेळी २०-२२ ठिकाणी सत्याग्रह करण्यात आला.[११] कोपरगाव आणि राहुरी तालुक्यात देखील या जंगल सत्याहाचे लोण पसरले. कायदेभंग करणाऱ्यास अटक करायला गेल्यानंतर हजारो लोकांनी प्रतिबंध केल्याचे चित्र सावरगाव व चंदनापुरी या खेड्यांमध्ये दृष्टीस पडले. या सत्याग्रहात अच्युतराव पटवर्धन, केशवराव गरुड, टिकेकर, चौधरी, श्री. ग. सरदेसाई हे सहभागी झाले. सर्वात महत्वाची बाब म्हणजे या सर्व जंगल सत्याग्रहात गरीब शेतकरी सहभागी झाले होते. इ. स. १९३० व १९३२ साली गांधीजींनी सुरु केलेल्या या चळवळीत स्त्रिया आणि ग्रामीण भागातील शेतकरी प्रथमच सहभागी झाले होते. अन्य प्रांतांच्या तुलनेत मुंबई प्रांतांतील स्त्रियांचा चळवळीतील सहभाग राज्यकर्त्यांच्या नजरेत भरण्यासारखाच होता.[१२]

इ. स. १९३० ते १९३९ या काळात महाराष्ट्रातील साखर उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली गेली. इ. स. १९३२ साली साखर उद्योगाला संरक्षण देण्यासंबंधीचे विधेयक मंजूर करण्यात आले. त्यातच १९३८ साली या उद्योगाबाबत चौकशी समिती नेमण्याची आणि संरक्षणाची व्याप्ती व कालावधी वाढविण्याची तरतूद करण्यात आली. त्याचबरोबर जागतिक मंदीमुळे अन्नधान्य, कापूस, शेंगदाणा या नगदी पिकांच्या किंमतींत १९३४ पर्यंत घट होत होती. साखर उद्योगाला संरक्षण मिळाल्यानंतर शेतकरी ऊस उत्पादनाकडे वळणे साहजिक होते. इ. स. १९३२ साली भारतात एकूण ३० साखर कारखाने होते. तर मुंबई इलाख्यात बेलापूर येथे युरोपीयनांच्या मालकीचा केवळ एक कारखाना इ. स. १९३२ मध्ये होता. १९३९-४० पर्यंत मुंबई प्रांतात ११ साखर



कारखाने होते. नीरा, प्रवरा, गोदावरी या नद्यांचे पाणी कालवे काढून शेतीसाठी उपलब्ध करून देण्याची सोय झाल्यामुळे ऊसाची लागवड करण्यास उत्तेजन मिळाले. अहमदनगर जिल्ह्यातील कालव्यांच्या प्रदेशात जुनीपुराणी यंत्रसामुग्री पडत्या भावाने खरेदी करून साखर उद्योगाची उभारणी करण्यात आली. हे सर्व कारखाने खाजगी मालकीचे होते. ऊस शेतीमुळे जसा शेतकरी सधन होत गेला. तसा तो आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी राष्ट्रीय आंदोलनांमध्ये देखील सहभागी होऊ लागला. शेतकरी वर्गाप्रमाणेच अहमदनगर जिल्ह्यातील व्यापारी वर्गाने देखील इ. स. १९३० ते १९४७ या काळात भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.[१३]

इ. स. १९४२ मध्ये ब्रिटिशांच्या विरोधात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने 'चले जाव' आंदोलन सुरु केले. या आंदोलनावेळी असहकार आणि सविनय कायदेभंगाच्या वेळी वापरल्या गेलेल्या तंत्रांऐवजी आणखी नव्या तंत्रांचा स्विकार करण्यात आला. यामध्ये प्रभातफेरी, निषेध सभा, मोर्चे, राष्ट्रीय ध्वज संचलन करणे, पोस्ट बॉक्स फोडणे, तारायंत्र तोडणे, राष्ट्रीय गीत गाणे, प्रतिसरकारची स्थापना, भूमिगत आंदोलन करणे, गुप्त रेडिओ चालवणे, गुप्तपणे पत्रके वाटणे यासारख्या मार्गांचा अवलंब करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरील सर्व महत्वाच्या नेत्यांना अटक झाल्यामुळे जनतेने उत्स्फूर्तरित्या स्वयंप्रेरणेने आंदोलनात सहभाग घेतला. अहमदनगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये या आंदोलनाचे लोण पसरले. ऑगस्ट १९४२ पासून ३१ जानेवारी १९४४ पर्यंत अहमदनगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये ब्रिटिश सरकारच्या विरोधात काही ना काही घटना विरोधानिमित्त घडत होती.[१४] अहमदनगर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये चलेजाव आंदोलनाला पाठिंबा मिळाला. परंतु अहमदनगरमधील चलेजाव आंदोलनाचे ठळक वैशिष्ट्ये म्हणजे अहमदनगरमधील बॉबस्फोटाची विविध प्रकरणे होत. इ. स. १९४२ च्या डिसेंबर अखेरीपर्यंत अहमदनगर जिल्ह्यात बॉम्बस्फोटाची २९ प्रकरणे झाली. या २९ बॉबस्फोटांपैकी पंचवीस बॉबस्फोट केवळ अहमदनगर येथे झाले होते. तीन बॉबस्फोट संगमनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत तर एक बेलापूर रस्त्यावर झाला होता. अहमदनगर शहरातील सरोष चित्रपट[illegible] डिसेंबर १९४२ रोजी झालेला बॉबस्फोट अतिशय गंभीर स्वरूपाचा होता. त्यात [illegible] जण जखमी झाले. त्यापैकी ६ जणांची प्रकृती गंभीर होती. [illegible] नावाच्या व्यक्तींचा मात्र

Savitribai College of Arts ID No. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

गेला. क्रांतिकारकांनी बॉंब बनवण्यासाठीची सामुग्री पुण्याच्या देहूरोड येथील दारूगोळ्याच्या लष्करी डेपोतून मिळवली होती. नगरच्या छावणीतील युरोपियन सैनिक सिनेमा पाहण्यासाठी सरोष सिनेमागृहात येतात हे पाहून क्रांतिकारकांनी बॉंबस्फोट घडवून आणला होता. लष्कराशी संबंधित असल्यामुळे या प्रकरणात संशयावरून बाळासाहेब सप्तर्षी, डॉ. घाटे, हबीबखान, राधाकिसन खोमणे, घनश्याम वऱ्हाडे, अण्णा कामठी आणि आहेर गवळी या सात आरोपींना अटक केली. परंतु सबळ पुराव्याअभावी त्यांना सोडून द्यावे लागले.[१५]

अशा प्रकारे अहमदनगर जिल्ह्यात स्वातंत्र्य चळवळ विकसीत होत गेली. इ. स. १८१८ ते १८८४ या काळापर्यंत अहमदनगर जिल्ह्यातून ब्रिटिशांना झालेला विरोध हा असंघटित स्वरूपाचा होता. परंतु राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर (१८८५) तो संघटीत स्वरूपात प्रकट होऊ लागला. इ. स. १८८५ ते १९२० पर्यंत सर्वसामान्य जनतेची जनजागृती घडून ती जनता राष्ट्रीय चळवळीकडे आकृष्ट होऊ लागली. परंतु गांधीयुगाची सुरुवात झाल्यानंतर सर्वसामान्यांचा राष्ट्रीय चळवळीतील सहभाग वाढत गेला. अहमदनगर जिल्ह्यातील जनतेने, नेत्यांनी असहकार चळवळ (१९२०) सविनय कायदेभंग चळवळ (१९३०) व चलेजाव चळवळ (१९४२) यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. यामध्ये शेतकरी, आदिवासी, स्त्रिया, दलित अशा सर्वच समाज घटकांचा सहभाग वाढत गेला. त्यामुळेच अहमदनगर जिल्ह्यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान महत्त्वाचे ठरते.

## संदर्भ आणि टिपा


०१. वृषाली तारे, पेशवेकालीन सुभे अहमदनगर : एक प्रशासकीय आर्थिक व सामाजिक अभ्यास (१७५९ ते १८१८), अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, १९९२, पृ. ४-५

०२. *Maharashtra State Gazetteers,* Ahmednagar Dist. Mumbai, 1976, p. 140.

०३. कित्ता, पृ. १४४.

०४. कित्ता, पृ. १४५.

०५. वि. गो. खोबरेकर, *महाराष्ट्रातील स्वातंत्र्यलढे (१८१८-१८८४)*, मुंबई, १९९४, पृ. ९०.

०६. कित्ता, पृ. ९१.

०७. *महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर*, अहमदनगर जिल्हा, पूर्वोक्त पृ. १५८.

०८. सुमन वैद्य व शांता कोठेकर, *महाराष्ट्रातील कॉंग्रेसचा स्वातंत्र्यलढा (१८८५-१९२०)*, मुंबई, २००८, पृ. १०५.

०९. *महाराष्ट्र राज्य गॅझेटियर*, अहमदनगर जिल्हा, पूर्वोक्त पृ. ३५७.

१०. य. दि. फडके, *विसाव्या शतकातील महाराष्ट्र*, खंड ३, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००८, पृ. ५१.

११. *Source Material For a History of Freedom Struggle; Civil Disobedience Movement,* (Oct. 1930- Dec. 1941) Vol. XII, Bombay, 1995, p. 252-53.

१२. य. दि. फडके, पूर्वोक्त, पृ. ६९.

१३. कित्ता, पृ. २२-२३.

१४. *Calender of 'Quit India' Movement in the Bombay Presidency,* Dept. of Archieves, Bombay, 1985, p. 371.

१५. कुमार केतकर, *कथा स्वातंत्र्याची*, पुणे, १८८५, पृ. २७८.


Savitribai College of Arts ★ ID. No. PU/AN/A/58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

**PRINCIPAL**
**Savitribai College of Arts**
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar